VOLUME - VII, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2019
GENIUS - ISSN 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.631 (www.sjifactor.com)

# १५. आदिवासींची विवाहसंस्कृती

**डॉ. वैजयंती पेशवे**
मराठी विभाग प्रमुख, कमला नेहरू महाविद्यालय, नागपूर.

पृथ्वीवरील सर्व मानवांची शरीररचना सारखी दिसते . त्यांचा मुलभूत गरजाही समान आहेत. त्यांची सुखदु:खे भावभावनाही समान आहेत . असे असले तरी प्रत्येक मानव समूह हा दुसऱ्या मानव समूहापेक्षा वेगळा दिसतो आणि हा वेगळेपणा दिसून येण्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांची संस्कृती. टायलय ने संस्कृतीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "समाजाचा घटक म्हणून व्यक्ती जे ज्ञान, श्रद्धा, कला नितीतत्वे, कायदे, रूढी आणि इतर बाबी प्राप्त करून घेते या सर्वांच्या संमिश्र एकीकरणाला संस्कृती असे म्हणतात. कोणतीही संस्कृती एकदम उदयास येत नाही तर ती हळूहळू घडत जाते. त्या घडण्यातून तिला विशिष्ट आकार प्राप्त होतो. तिची तत्वे तयार होतात" .

आदिवासींचा वेगळेपणा त्यांच्या संस्कृती मुळे दिसून येतो. आदिवासी म्हणजे लोक समाजाचा प्राचीनतम भाग. त्यांची प्राचीन परंपरा, विविध चालीरीती, त्यांची भाषा, रंगबेरंगी पोशाख, समुदायिक जीवन, सुखादु:खातील समुदायिक सहभाग अद्भुतरम्य आणि बहुरंगी उत्सव. सणातील नैसर्गिक आणि परिपूर्ण आनंद या सर्वांच्या साह्याने त्यांच्या संस्कृतीचे होणारे दर्शन अतिशय विलोभनीय आहे. एका विशिष्ट भूप्रदेशात राहणारा समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटांच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात. भारतातील आदिवासी संख्या ५६३ एवढी आहे. या जमातीची विविध नावे आहेत. भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जमात असा उल्लेख केला आहे.

या आदिवासी जमाती भारतभर विखुरलेला दिसतात. डोंगराळ प्रदेशात राहणारे हे आदिवासी प्रगत जीवनाशी अपरिचित आहेत. आपल्या रूढी, परंपरा यांचे पालन करतांना दिसतात. अश्या या आदिवासींच्या जीवनाची पुढील वैशिष्टये दिसून येतात.

1. आदिवासी समाज बाह्य संपर्कापासून अलिप्त व दुर्गम असलेल्या डोंगराळ भागात राहतो.
2. आदिवासींची लोकसंख्या मर्यादित असते –
3. आपली उत्पत्ती एकाच पूर्वजांपासून झाली असे मानतात (एकच रक्तसंबंध)
4. यांची भाषा बोलीभाषा असते (व्याकरण, नियम नसतात)
5. आदिवासींचे रितीरिवाज, रूढी, परंपरा, धर्मश्रद्धा इत्यादीमुळे यांचे जीवन नियंत्रित असते. खाणे–पिणे, आचार–विचार, केशभूषा, वेशभूषा यात साम्य असते.
6. त्यांची अर्थव्यवस्था निसर्ग व स्वत:चे परिश्रम यावर आधारलेली असते. "नफा मिळविणे" हे ध्येय नसते.
7. धर्म व धर्माचरण यांना जीवनात अनन्यसाधारण महत्व असते.
8. समान बोलीभाषा, समान धर्माचरण, समान संस्कृती व समान सामाजिक नियम यामुळे आदिवासींच्या आचारविचारात एकजिनसीपणा दिसून येतो.
9. नृत्य व मद्यपान आदिवासी संस्कृतीतील महत्वाचा भाग आहे.